पुढारी

# आत्माराम विद्यामंदिरात सायबर सुरक्षा मार्गदर्शन

**कराड : पुढारी वृत्तसेवा**

आत्माराम विद्यामंदिर ओगलेवाडी येथे विद्यार्थी सुरक्षा समिती व प्रहरी गट अंतर्गत सायबर सुरक्षा मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड येथील सायबर शक्ती क्लबच्या वतीने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये तसेच नागरिकांमध्ये वाढत्या सायबर गुन्ह्यांविषयी जागरूकता निर्माण करणे आणि सुरक्षित डिजिटल व्यवहारांच्या सवयी रुजविणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.



**कराड : सायबर सुरक्षेबाबत माहिती देताना प्रियांका शिंदे, शिक्षक.**

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजीव वाघ आणि सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा उपक्रमाच्या समन्वयक डॉ. प्रियांका शिंदे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. सौ. अनुपमा काटकर, अजय शिर्के, दीपू सिंग आणि सौ. गायत्री केसकर यांचे या उपक्रमासाठी सहकार्य लाभले. आकांक्षा माने, तुषार खोचरे, कल्याणी पाटील आणि हर्षल डोळे, तसेच आत्माराम विद्यामंदिरमधील शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

Satara Edition
Sep 08, 2026 Page No. 04
Powered by: erelego.com